## विमा संचालनालयांतर्गत तांत्रिक सहायक,विमा संचालनालय, गट-'क' परीक्षा

**प्रश्नपत्रिकांची संख्या:- एक , प्रश्नसंख्या - २०० व गुण - ४००**

**-: परीक्षा योजना :-**

| विषय | गुण | माध्यम | दर्जा | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | १०० | मराठी | शालांत | दोन तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| इंग्रजी | १०० | इंग्रजी | पदवी | | |
| सामान्य ज्ञान व बुध्दिमापन चाचणी आणि विमा संचालनालयांतर्गत माहिती | २०० | मराठी व इंग्रजी | संबंधित विभागात काम करण्यास आवश्यक ज्ञान | | |

**-: अभ्यासक्रम :-**

**मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बुध्दिमापन चाचणी आणि विमा संचालनालयांतर्गत माहिती या विषयामध्ये खालील घटक व उपघटकांचा समावेश असेल.**

### १. मराठी :-

सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे

### २. इंग्रजी :-

Common Vocabulary, Sentence structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

### ३. सामान्य ज्ञान व बुध्दिमापन चाचणी आणि विमा संचालनालयांतर्गत माहिती

**१) सामान्य ज्ञान**

**(अ) चालू घडामोडी :**

जागतिक तसेच भारतातील सामाजिक, साहित्य, राजकारण, शास्त्र, सामाजिक व औद्योगिक सुधारणा, क्रीडा विषयक बाबी, अर्थ विषयक बाबी.

**(ब) महाराष्ट्राचा भूगोल:**

महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न.

**(क) माहितीचा अधिकार कायदा - २००५**

**(ड) महाराष्ट्राचा इतिहास**

सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग,स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी (सत्यशोधक समाज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय क्रांती चळवळ, डावी विचारसरणी कम्युनिष्ट चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासींचा उठाव.)

**(इ) भारतीय राज्यघटना**

घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या.

**(ई) संगणक व माहिती तंत्रज्ञान**

आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलोजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध,नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य.

## २) बुध्दिमापन चाचणी

उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो याचा अदांज घेण्याच्या दृष्टिने बुध्दयांक मापनाशी संबंधीत प्रश्न.

## ३) विमा संचालनालयांतर्गत माहिती

१. शासकीय विमा निधीची माहिती

२. सर्व साधारण (Non-Life) विमा क्षेत्रातील विमा पत्रक प्रकार व त्यांची विमा जोखीम व्याप्ती

३. विमा मूल तत्वे व विमा व्यवहारात उपयोग (Principle & Practice of Insurance) (भारतीय विमा संस्था मुंबई यांनी अनुज्ञप्ती (Non-Life) परीक्षेसाठी विहित केलेला अभ्यासक्रम )

४. विमा नियमन विकास प्राधिकरण (केंद्र शासनाची विमाव्यवसायाचे नियमीकरण करण्यासाठीची स्वतंत्र यंत्रणा) (याची माहिती वेबसाईट- www.irda.gov.in येथे पहावी.)

**********